# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री. संदीप सुरेश उबाळे वय ३४वर्ष पद कनिष्ठ अभियंता पंचायत समिती सिदखेड राजा, वर्ग–३ मुळ रा. धामणगाव बढे, ता मोताळा, जि.बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/– रुपये |
| घटनास्थळ | पंचायत समीती कार्यालय चे आवर सिंदखेड राजा |
| घटना तारीख | दि.२३.३.२०२१ |

थोडक्यात हकीकत :–

गुन्हयाची हकीकत अश्या प्रकारे आहे की तक्रारदार किसन रामभाऊ कुलाल, वय ५५ वर्ष,,रा. दुसरबिड, ता.सि.राजा, जि.बुलडाणा यांनी सन २०२० मध्ये सिदखेड राजा पंचायत समिती अंतर्गत ग्राम वाकद, राहेरी व आडगाव राजा येथील जिल्हा परीषद शाळेच्या खोल्यांचे बांधकाम केले असुन त्यांचे एकुण बिल एकुण २५,२६,०००/–रु.झाले आहे. काम पुर्ण करुन बिल काढणे करीता कनिष्ठ अभियंता श्री संदीप उबाळे पंचायत समीती सिदखेड राजा यांना तक्रारदार हे मागील हप्त्यामध्ये भेटले असता. त्यांनी सांगितले की तुमचे बिल काढायचे असेल तर तुम्हाला बिलाचे .३ टक्के प्रमाणे ७२०००/–रुपये दयावे लागतील असे म्हणुन त्यांनी तडजोडीअंती पंच क्र.१ यांचे समक्ष ७००००/–रुपये लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष पहीला हप्ता ४०,०००/–रुपये लाचेची रक्कम गैरवर्तन केले.

एकंदरीत लोकसेवक आलोसे श्री. संदीप सुरेश उबाळे वय ३४ वर्ष पद कनिष्ठ अभियंता पंचायत समिती सिदखेड राजा, वर्ग–३ यांनी त्यांचा आर्थीक लाभ करुन घेण्यासाठी तक्रारदार किसन रामभाऊ कुलाल यांना ७०,०००/– रूपये लाचेची मागणी करून पहीला हप्ता ४०,००० रु ची लाच स्वीकारुन त्यांनी लोकसेवक पदाला न शोभणारे कृत्य केले आहे. त्यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंधक कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा.श्री. संजय चौधरी पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. आर.एन.मळघणे, पोलीस उपअधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, नापोकॉ रविंद्र दळवी, पोकॉ जगदीश पवार यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

( आर.एन.मळघणे )
पोलीस उपअधिक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner